Open Access
IJASSH
International Journal of Arts, Social Sciences and Humanities
(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 2, June 2023; Pages 26 – 30
DOI: 10.5281/zenodo.10223771

**Original Research Article**

# प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांमधील अवधान अस्थिरता व अतीक्रियशील विकृतीच्या प्रसराचा अभ्यास

डॉ. क्षीरसागर ओ. एम.[1]
प्राचार्य, बापूसाहेब पाटील एकंबेकर कॉलेज उदगीर जि. लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

ढवळे पंकज बालाजी[2]
संशोधक विद्यार्थी, शिक्षण शास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* [1]kshirsagar.om1@gmail.com

Received: 19 April, 2023 | Accepted: 27 May, 2023 | Published: 02 June, 2023

**सार**

सध्याच्या धावपळीच्या स्पर्धेच्या आणि वेगवान जीवनात प्रत्येक पालकांना आपली मुले स्पर्धेत टिकले पाहिजे त्याने स्पर्धेच्या जगात सर्वांसोबत असले पाहिजे. या हेतूने 21 व्या युगातील पालक विविध नवनवीन तंत्राचा, एप्लिकेशन्स इत्यादीचा सरास वापर करण्यासाठी त्यांना वाव देताना दिसत आहेत. त्यामुळे काही वेळा ती भावनिक दृष्ट्या, मानसिक दृष्ट्या तसेच शारीरिक दृष्ट्या बाधित होऊन शारीरिक, मानसिक बदलामुळे विविध प्रकारच्या विकृतींना सामोरे जात आहेत. आधुनिक काळात या विकृत लक्षणांचे प्रमाण त्यांच्या वर्तनात फार झपाट्याने वाढताना आढळत आहेत. विकसित मुलांच्या वर्तनात सामान्यता विघातक, तोडफोड वृती, किंवा देखभाल करणाऱ्या व्यक्तीला प्रतिक्रिया देताना अपमानास्पद बोलणे, असंयमी वर्तन, प्रतिक्रिया इत्यादी हालचाली वर्तनात दिसून येतात. आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मुलांना विविध प्रकारच्या सोयी सुविधा मिळत आहेत. पण ती मुले प्रत्यक्षात एक एकटी राहण्यात जास्त आणि मित्रपरिवार यांच्यामध्ये कमी प्रमाणात राहताना दिसत आहेत. त्यांना बाहेरच्या वातावरणाचा संबंध कमी प्रमाणात येतो. ते आज-काल मोबाईल, टीव्ही, व्हिडिओ गेम, इंटरनेट विविध एप्लीकेशन आणि सामाजिक प्रसार माध्यमे इत्यादी साधनांच्या वापरामुळे एकांतात राहणे पसंत करताना दिसत आहेत. आई वडील नातेवाईक यांच्याकडून त्यांना जास्त वेळ मिळत नाही. मिळाला तर तो वेळ लाड करणे किंवा शिस्त लावण्यात जातो. परिणामी मग ती मुले कुठल्यातरी आजार किंवा विकृतिशी जोडली जातात. मुलांमध्ये विविध प्रकारचे दोष दिसायला लागतात. जसे की बोलण्यात, लिहिण्यात, वाचण्यात, बसण्यात, क्रिया करताना अशी दोष असणारी प्रत्येक मुलं हे अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीची पण असण्याची शक्यता असते.

**महत्वाचे शब्द:** अवधान अस्थिरता, अतिक्रियशिल, विकृती, प्रसार

**प्रस्तावना**

**अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती**

अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती ही एक वर्तन विकृती आहे. त्यामध्ये मुल विशिष्ट प्रकारचे वर्तन करताना दिसून येतात. जसे की ही विकृती असणारी मुल हे एके ठिकाणी शांत बसणे, नको ते आवश्यक, अनावश्यक हालचाली करणे, विसरून जाणे, सतत हात किंवा पाय हलवणे, संभाषण करताना अडथळा निर्माण होणे, अभ्यासात विविध चुका करणे, सूचना लक्षात न ठेवणे,कार्य पूर्ण करण्यात अयशस्वी होणे, आवश्यक कामे टाळणे, सहज विचलित होणे, एखाद्या वस्तू सोबत खेळत बसणे, टेबल वाजवणे, पेन हलवणे, सतत जागा सोडणे, रांग सोडून पळणे, अशा प्रकारची विविध कृती करताना दिसून येतात. अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती हा एक मुलावर परिणाम करणारा मानसिक आजार आहे. जो मुलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कृतीचा आवेग दाखवतो. जगात या विकाराचे वर्णन केले असले तरी भारतीय अभ्यासामध्ये याची जागृती कमी प्रमाणात आहे. ही मानसिक विकृती असून शालेय वयातील मुलांमध्ये जास्त प्रमाणात असल्याचे मागील संशोधनावरून दिसून येते. या विकृती अंतर्गत प्रामुख्याने दोन घटकाचे आधारे निकषात्मक स्वरूपात वर्तन बदल व्याख्या व्यक्त करता येते. ती म्हणजे मुलांमध्ये वर्तनात अवधान नसणे, ज्यात निष्काळजीपणा, विस्मरण, दैनंदिन क्रियेतील मोठ्या प्रमाणात एकाग्रतेचा अभाव असतो. एकाग्र न करता आल्यामुळे अति चंचलता किंवा अतिक्रियाशीलता हे लक्षण दिसून येतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये अस्वस्थता, प्रतिसादात असंबंधता, तसेच खेळताना अशांतता आणि निरंतर बडबड, अतिउत्साही पणा दिसतो कार्य करताना अडचण येते किंवा इतरांना अडथळा निर्माण करणे असे वर्तन घडते. संभाषणात, बोलण्यात व्यत्तय आणणे, त्यांना वारंवार प्रश्न विचारणे, त्रास देणे अशा आतताईपणामुळे अतीक्रियाशील विकृती त्या मुलांमध्ये आढळून येते. हीच लक्षणे मुलांच्या वर्तनात, घरी, शाळेत समाजात, मित्रांमध्ये घडून येतात.

अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती ग्रस्त बालकात ही लक्षणे प्राधान्याने पूर्व शालेय प्राथमिक शिक्षणात दडलेली आढळतात. तसेच पालकांशी संबंध पालन पोषण शैली यातूनही विकसित होतात. ज्यामुळे शैक्षणिक प्रगतीमध्ये विकास न होणे, शिस्तीचा भंग करणे, पालन न करणे असे वर्तन घडून येते. अभ्यासात, खेळात एकाग्रतेचे अभावामुळे प्रगती दिसून येत नाही. अतिक्रियाशीलतेमुळे एका ठिकाणी बसून कृती करणे, खेळ खेळणे, अभ्यास करणे यात सातत्य राहत नाही. अशा विकृती ग्रस्त मुला मुलींमध्ये विसंघटन, अल्प आत्मप्रतिष्ठा, विस्मरणाची वृत्ती, स्वतःला कमी किंवा हुशार लेखनाची वृत्ती विकसित झाल्यामुळे सतत चिंताग्रस्त राहणे, उदासी राहणे, सामाजिक दृष्ट्या अविकसित असणे, खुजेपणाची धारणा इत्यादीतून ही लक्षणे तीव्र होताना आढळतात.

अमेरिकन सायकॅट्रिक असोसिएशन (APA) ने “मानसिक विकाराची नैदानिक व सांख्यिकी नियमपुस्तिका -5” मध्ये या विकृतीचे मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. त्यानुसार ठरवले गेलेली लक्षणे जर मुला-मुलींमध्ये दिसून आली तर त्या मुलांना अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती ग्रस्त म्हणून ओळखले जाते. मानसिक विकाराची नैदानिक व सांख्यिकी नियमपुस्तिका-5 हे मुलांचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे पुरवते आणि त्या तत्त्वानुसार जर मूल सतत विकासामध्ये व्यतय आणत असेल किंवा अतिक्रियाशील नमुना दाखवीत असेल व असे जर मागील सहा महिन्यापासून होत असेल तर ते मूल अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती चा प्रसारक आहे असे समजले जाते. APA च्यामते जगातील पाच टक्के ते वीस टक्के मुलांमध्ये या विकृतीचा प्रसार असल्याचे जाहीर केले आहे. तसेच पूर्व संशोधनावरून ही दिसून येते.

**मानसिक विकाराची नैदानिक व सांख्यिकी नियमपुस्तिका- 5**

**(DSM -5)**

ही नैदानिक नियमपुस्तिका सन 2000 मध्ये सुरू करण्यात आली. आणि पाचव्या नियम पुस्तिकेमध्ये संशोधन करून DSM-5 ही पुस्तिका सन 2007 मध्ये विकसित करण्यात आली. 2007 मध्ये अमेरिकन सायकॅट्रिक असोसिएशन (APA) ने यामध्ये पुन्हा संशोधन करून सन 2013 मध्ये DSM-5 ही अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती ची लक्षणे असलेली मार्गदर्शिका प्रकाशित केली. त्यावर ठरवून दिलेली लक्षणे किंवा वर्तणूक जर विद्यार्थ्यांमध्ये सहा महिने टिकून असेल तसेच शाळा, घर, समाज, मित्रमंडळी इत्यादीमध्ये त्यांच्या वर्तनात फरक जाणवत असेल तर त्या मुलामुलींमध्ये अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती आहे असे ठरवले जाते.

**अवधान अस्थिरता**

अवधान अस्थिरता ही मुलांमध्ये वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या मध्ये आढळते. या विकृतीमध्ये मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव, क्षणोक्षणी लक्ष विचलित होणे, ठिकाणी लक्ष नसल्यामुळे छोट्या छोट्या चुका करणे, सूचनांकडे लक्ष न देता सोपवलेली कामे पूर्ण न करणे, विसराळूपणा मुळे चष्मा, पेन, पाकीट, डबा वारंवार विसरणे, एकाग्रतेच्या अभावामुळे बराच वेळ चालणारे भाषण किंवा बोलणे न आवडणे, जास्त वेळ चालणारे कामे करणे कंटाळवाणी वाटतात परिणामी त्यांचा आत्मविश्वास कमी होतो.

**लक्षणे**

- कमी ऐकण्याची कौशल्य.
- क्रिया व गृहपाठ करण्यासाठी अडथळा येणे.
- आवश्यक असलेल्या वस्तू (रबर, पेन्सिल, पेन, डब्बा, वही, पुस्तके, चष्मा इत्यादी) हरवणे.
- दैनंदिन काम विसरणे.
- एकाग्रतेची कामे टाळणे.
- लक्ष केंद्रित करण्यात अडचणी येणे.
- शाळेच्या कामात वारंवार चुका करणे.
- सूचनांचे पालन न करणे.
- उपक्रम पूर्ण करण्यात अडचणी येणे.

**अतिक्रियाशील**

यामध्ये मुलांना एके ठिकाणी न बसणे, सतत चुळबुळ करणे, बसल्या ठिकाणी हात /पाय सतत हलवणे, उड्या मारणे, नको असलेली माहिती सांगणे, सतत बडबड करणे, एके ठिकाणी शांत न बसता हालचाल करणे, रांगेत न चालणे, इत्यादी प्रकारची विकृती असते. DSM-5 च्या आधारे अतिक्रियाशील विकृती असणाऱ्या मुलांमध्ये खालील लक्षणे आढळतात.

**लक्षणे**

- सतत चुळबुळ करणे.
- रांगेत न जाता रांग तोडून पळणे
- शांतपणे खेळण्यास त्रास होणे.
- सतत हात किंवा पाय हलवणे.

- प्रश्न पूर्ण न होताच उत्तरे देणे.
- नको त्यावेळी बडबड करणे.
- अती बोलणे /वायफळ बडबड करणे.
- इतरांच्या कामांमध्ये व्यत्यय आणणे.
- संभाषण करताना आपलीच बाजू मांडणे.

**उद्दिष्ट्ये**

- मुलं आिण मुली याच्यामध्ये अवधान अस्थिरता आणि अतिक्रियशील विकृतीच्या प्रसाराची तुलना करणे.
- विद्यार्थ्याच्या वर्तन सुधरणेविषयी जागरूकता निर्माण करणे.
- विद्यार्थ्याच्या इतर मानसिक विकरचा अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यपद्धती**

सदर संशोधनासाठी प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्याची माहिती ही शिक्षक,पालक, मित्र यांच्याकडून प्रश्नवलीचा माध्यमातून क्रॉस सेक्शनाल स्वरूपात मिळवली जाईल.

**संशोधनाची गरज**

अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसार झालेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. भारतातील ब-याचशा भागामध्ये अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसार असलेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी जास्त असल्याचे मागील संशोधनातून स्पष्ट झाले आहे. तरी पण अनेक लोकांना हा विकार ओळखणे कठीण जाते.

अमेरिकन सायकॅट्रीक असोसिएशन (APA) ने मानसिक विकाराची नौदानिक व सांख्यिकी नियम पुस्तिका – 5 ही आवृत्ती प्रकाशित केली त्यामध्ये अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसाराची मार्गदर्शक तत्त्वे सांगितले आहेत. त्यावरून खालील माहिती मिळविण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

- अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसार असलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी समजते.
- अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसार असलेल्या मुला मुलीचे प्रमाण समजते.
- पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना या विकारासाठी योग्य मार्गदर्शन करता येते.
- मानसिक इतर विकृतीची माहिती मिळते.
- या विकारावर उपचारासाठी योग्य प्रशिक्षण देवून निदान करता येते.

**सारांश**

अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृती हा सर्व सामान्य मानसिक विकारापौकी एक आहे. परंतु तो सर्वात जास्त गैरसमज असणारा विकार दिसून येतो. सहसा लोक या आजाराच्या लक्षणाकडे दुर्लक्ष करताना दिसून येतात. जेव्हा त्याचे लक्षणे विद्यार्थ्यांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येऊ लागतात. त्यावेळी मानसोपचार तज्ञ यांच्या सल्ल्यावरून समजते की ते अवधान अस्थिरता व अतिक्रियाशील विकृतीचा प्रसारक आहे आणि त्या सर्वांना योग्य मार्गदर्शन मिळावे व त्याचे निदान करण्यासाठी सुलभता यावी यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे ठरेल.

**संदर्भ सूची**

१. हरकारे अनुराधा (26/11/2020) मानसशास्त्र, अवधान अस्थिरता आणि अतिक्रियाशीलता विकृती, मराठी विश्वकोष
२. http://marathivishwakosh maharashtra.gov.in
३. प्रा. शिंदे सुवर्णा, प्रा. शिंदे के.डी. (2013), शैक्षणिक संशोधन आणि संख्याशास्त्र, श्री प्रकाशन, पुणे.
४. American Psychiatric Association (2013), Diagnostic and statistical manual of mental disorder (5th Ed.) Washington, D.C. : American Psychiatric Association.
५. DSM -5 Diagnostic and statistical Manual Disorder, 5th edition;
६. Diagnostic criteria: AAFP national research network.
१. अपसामान्य मानसशास्त्र, तृतीय वर्ष कला, अभ्यास पत्रिका क्र. 5; मुंबई विद्यापीठ. का (२०११ ते २०१९).